# नमुना-३

## खाजगी क्षेत्रातील जमीन वाटाघाटीने व थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्यासाठी जमीन मालक किंवा हितसंबंधीत व्यक्तींकडुन हरकती / सुचना मागविण्याबाबत जाहीर नोटिस

### उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी, पुसद यांचे कार्यालय, पुसद जि. यवतमाळ

क्रमांक /उविअ/भु.सं./अका/कावि/ ६४ /२०१८ दिनांक : ०२ फेब्रुवारी २०१८

ज्या अर्थी, कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, अकोला यांनी राष्ट्रीय महामार्ग विभाग, अकोला अंतर्गत यवतमाळ जिल्ह्यातील **दिग्रस-दारव्हा-कारंजा राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ सी.** या सार्वजनिक प्रयोजनाकरीता राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ व शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. संकिर्ण ०३/२०१५/प्रा. क्र. ३४/अ- मंत्रालय, मुंबई दि. १२.०५.२०१५ तरतुदीस अनुसरुन शासन निर्णय क्र. एलक्युएन-०१/२०१७/प्र.क्र.१२/अ २ दि. २५.०१.२०१७ नुसार खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने केंद्रीय रस्ते व परिवहन मंत्रालय तर्फे कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, अकोला यांचे नावे घेण्याबाबत प्रस्ताव जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्याकडे सादर केला आहे.

ज्या अर्थी, जिल्हाधिकारी यवतमाळ आदेश क्रमांक राजस्व-३/भु.सं.-२/कावि-९५०/१७ दिनांक १४/०९/२०१७ अन्वये उक्त प्रस्तावासंबंधी उक्त शासन निर्णय दिनांक १२ मे, २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर २०१५ आणि तदनुषंगिक शासन निर्णय, तसेच शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. एलक्युएन-०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२, दिनांक २५ जानेवारी २०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्या अर्थी, आता

१) मी, **श्री नितीनकुमार हिंगोले,** उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी, पुसद जिल्हा यवतमाळ याद्वारे, अनुसूची-एक मध्ये नमूद खासगी क्षेत्रातील जमीन खासगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने, केंद्रीय रस्ते व परिवहन मंत्रालय तर्फे कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, अकोला संबंधित खरेदी करावयाच्या जमिनीच्या जमिन मालकाचे नांव, गट नंबर व संपादन क्षेत्र इत्यादी तपशिल जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे. सदर जमिनीबाबत जमीन मालकांचे हिस्यावर हक्क हितसंबंध, दत्तक, वारसाहक्क, गहाण, दान, बोजा, बाकी, भाडेपट्टा, कर्ज बक्षीसपत्र, जप्ती, करार-मदार अथवा इतर कोणताही हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० (दहा) दिवसाचे आत पुराव्यानिशी लेखी तक्रार कार्यालयीन वेळेमध्ये सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, पुसद या कार्यालयामध्ये समक्ष दाखल करावी.

जर मुदतीमध्ये कोणीही हक्क, हितसंबंध किंवा आक्षेप व हरकत दाखल केले नाही तर कोणाचेही काही एक म्हणने किंवा हरकत नाही असे समजुन सदर मिळकतीवर कोणाचा बोजा आणि हितसंबंध नाही असे समजुन सदर मिळकतीचा खरेदी खताचा व्यवहार पुर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणा-या हरकती आमच्या कार्यालयावर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास सदर जमिन मालकांची मिळकत निर्बंध व बिनाजोखमीची असल्याचे समजुन हे कार्यालय मा. राज्यपाल, महाराष्ट्र शासन यांचे वतीने खरेदीचा व्यवहार केव्हाही पूर्ण करेल व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत कायदेशिररित्या बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

२.....

२) प्रकल्पासाठी जमिन थेट खरेदी घेताना जिल्हाधिकारी समिती मार्फत भूमी संपादन, पुर्नवसन व पुर्वस्थापन करतांना वाजवी भरपाई मिळण्याच्या व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील कलम २६ ते ३० व शेडयुल १ तसेच महसूल व वन विभाग, शासन निर्णय दि. १२.०५.२०१५ व दि. ३०.०९.२०१५ च्या तरतुदीनुसार संबंधित जमिनीसाठी परिगणित होणा-या एकुण मोबदल्याच्या रकमेवर २५ टक्के रक्कम वाढीव देऊन मोबदला निश्चित करण्यात येईल.

३) संबंधित भुधारकाकडुन शासनाच्या प्रस्तावित धोरणाप्रमाणे खाजगी जमिन खाजगी वाटाघाटीद्वारे सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, अकोला यांचे नांवे थेट खरेदी देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः व अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असणेबाबतचे संमतीपत्र (विकल्प) मागवित आहे. संमतीपत्राचा (विकल्प) विहित नमुना या कार्यालयामार्फत संबंधित भुधारकांना उपलब्ध करुन देण्यात येतील.

**अनुसूची (एक)**

## भूसंपादन प्रकरण क्र. ०६/४७/२०१७-१८ मौजे रोहणादेवी ता. दिग्रस जि. यवतमाळ

**प्रकल्पाच्या आखणीमध्ये समाविष्ट (खरेदी घ्यावयाच्या) जमिनीचा तपशिल**

| अ. क्र. | जमिन मालकाचे नांव | गांव | स.नं. / गट क्र. | ७/१२ प्रमाणे एकुण क्षेत्र (हे.आर) | खरेदी करावयाचे क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | निलय दिपकराव वानखेडे | रोहणादेवी | 25 पै | 1.68 | 0.0115 |
| | | | | **एकुण** | **0.0115** |

उपविभागीय अधिकारी तथा
भुसंपादन अधिकारी, पुसद